तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/ 9606

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- 27 FEB 2020

प्रति

अध्यक्ष/सचिव,

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे

**विषय - सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....**

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**

**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**

**३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र एसएफएस-२०१९/प्र.क्र.११२७/एसएम-२ दिनांक २०.०९.२०१९**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णय नुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे | आदित्य इंग्लिश मिडिअम स्कुल डुडुळगाव, पो. आळंदी देवाची, ता. हवेली, जि. पुणे | इंग्जी | नवीन शाळा (राज्यमंडळ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी) सर्व शाखा | २०१९-२० |

अटी व शर्ती :-

१. शासन निर्णय संदर्भ क्रं ३ मधील अट क्र. १ नुसार सदर प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपुर्वीच सुरू केली नसल्याची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यास संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिप पुणे यांनी सदर शाळेकडून रूपये एक लक्ष दंड वसूल करून त्याचा अहवाल शासनास व या कार्यालयास सादर करावा. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याची खात्री करून पुढील कार्यवाही करावी.**

२. सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

५. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णवाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

१०. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(अनुराधा ओक)

**शिक्षण उपसंचालक**

**पुणे विभाग पुणे-१**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**

**१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

**१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२**

**२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दूरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

---

**जा.क्र.शिउसं/प्राथ-२०४/शुध्दीपत्र/पुवि/२०२२/**४४६१
2 5 APR 2022

वाचा : १. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-२०१९/प्र क्र ११२७/एसएम-२,दि.२०.९.२०१९
२.या कार्यालयाचे आदेश जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि१७७८//२०१९-२०,दि.२७.२.२०२०
३.शासन शुध्दीपत्रक क्र एसएफएस-१०१९/प्र क्र ११२७/एसएम-२ दि.२४.८.२०२१
४ मुख्याध्यापिका आदित्य स्कूल डुडुळगांव पुणे यांचे पत्र जा क्र २१-२२/२७ दिनांक ११.३.२०२२

**शुध्दीपत्र :**

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ,ओतूर ता.जुन्नर जि. पुणे संचलित आदित्य इंग्लिश मिडिअम स्कूल, डुडुळगांव पो.आळंदी देवाची ता.हवेली जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. १ ली ते इ. १२ वी ) सर्व शाखा इंग्रजी माध्यम या शाळेस सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयाव्दारे नवीन शाळा सुरु करणेस परवानगी देणेत आलेली होती. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय क्र. १ चे शासन निर्णयाचे अनुषंगाने संदर्भीय क्र २ व्दारे उक्त शाळेस शाळा परवानगीचे आदेश निगमित केलेले होते.

सदर शाळेच्या मंडळ संलग्नतेमध्ये राज्यमंडळ ऐवजी सी बी एस.ई. अशी दुरुस्ती करण्यास शासन शुध्दीपत्रक संदर्भीय क्र. ३ नुसार शासन मान्यता देण्यांत आलेली आहे.

तरी संदर्भीय क्र. ४ चे शासन शुध्दीपत्राचे अनुषंगाने या आदेशाव्दारे शुध्दीपत्राव्दारे नमूद करणेत येते की, संदर्भ क्र. १ च्या **शासन निर्णयामधील शाळेचे मंडळ राज्यमंडळ ऐवजी सी बी एस ई असे वाचावे** व सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भ क्र. १ दि.२०.९.२०१९ च्या शासन निर्णयातील व या कार्यालयाच्या संदर्भीय क्र. २ च्या आदेशातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे

प्रति,
मुख्याध्यापिका आदित्य स्कूल डुडुळगांव पुणे
प्रत : माहितीस्तव सविनय सादर
श्री प्रदिप पडोळे, कक्ष् अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,विस्तार भवन मुंबई-३२.

शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/उ मा/ शुध्दीपत्रक/२०२४-२०२५/1717/दिनांक : 27 AUG 2024

**शुध्दीपत्रक :**

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगी पत्रातील शासनामार्फत निर्गमित शुध्दीपत्रक
श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे संचलित आदित्य इंग्लिश मिडिअम स्कुल, डुडळगाव पो आळंदी देवाची, ता. हवेली जि पुणे

संदर्भ : १.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस- १०१९/प्र क्र ११२७/एसएम-२,दिनांक २०.९.२०१९
२.शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एसएफएस-१०१९/प्र क्र ११२७/एसएम-२,दिनांक २४.८.२०२१
३..या कार्यालयाचे आदेश जा क्र शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/१७७८,दि.२७.२.२०२०
४.शालेय शिक्षण विभागामार्फत शासन शुध्दीपत्रक क्र. एसएफएस-१०१९/प्र क्र ११२७/एसएम-२, दि.२५.१.२०२३
५.प्राचार्य आदित्य इंटरनॅशनल स्कूल डुडुळगांव पीसीएमसी-४१२१०५यांचेकडील पत्र जा क्र ०२७ दिनांक ६.१२.२०२३

शासन निर्णय संदर्भीय क्रमांक १ अन्वये श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे संचलित आदित्य इंग्लिश मिडिअम स्कुल, डुडळगाव पो आळंदी देवाची, ता. हवेली जि पुणे या नविन प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा इंग्रजी माध्यम राज्यमंडळ संचलित शाळेस सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यांत आलेली होती. तदनंतर संदर्भीय क्रमांक १ चे शासन निर्णयाचे अनुषंगाने या कार्यालयाने संदर्भीय क्रमांक ३ व्दारे सदर शाळेस परवानगीबाबत आदेश निर्गमित केलेले होते.

तदनंतर संदर्भीय क्र. २ अन्वये उपरोक्त शासन निर्णयामध्ये शाळेचे मंडळ **राज्यमंडळ ऐवजी सी.बी.एस.ई** असे वाचावे यानुसार शासन शुध्दीपत्रक निर्गमित झालेले आहे तसेच तदनंतर ४ चे शासन शुध्दीपत्रकान्वये शाळेचे नांव **आदित्य इंटरनॅशनल स्कूल** असे वाचावे तसेच संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील यानुसार संदर्भीय क्र. २ व ४ चे शासन शुध्दीपत्रक निर्गमित झालेले आहे

तसेच सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी शि.अ. (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांची राहील . शासन शुध्दीपत्रक संदर्भीय क्रमांक २ व ४ चे अनुषंगाने संदर्भीय क्रमांक ५ चे संबंधित प्राचार्याचे प्राप्त विनंतीनुसार हे पत्र निर्गमित करणेत येत आहे.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण
तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

27/8/24

प्रति,
.प्राचार्य, श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे संचलित आदित्य इंटरनॅनल स्कूल सीबीएसई गट क्र.७६ डुडुळगांव ता हवेली जि पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मा.शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत : माहितीस्तव रवाना : शिक्षणाधिकारी (पुणे) जिल्हा परिषद,पुणे

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com

वेब साईट- WWW.dydepune .com


---

जा.क्र. शिउसं/उ मा/ शुध्दीपत्रक/२०२४-२०२५/9717/दिनांक : 27 AUG 2024

**शुध्दीपत्रक :**

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगी पत्रातील शासनामार्फत निर्गमित शुध्दीपत्रक

श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे संचलित आदित्य इंग्लिश मिडिअम स्कुल, डुडळगाव पो आळंदी देवाची, ता. हवेली जि पुणे

संदर्भ : १.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस- १०१९/प्र क्र ११२७/एसएम-२,दिनांक २०.९.२०१९

२.शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एसएफएस-१०१९/प्र क्र ११२७/एसएम-२,दिनांक २४.८.२०२१

३..या कार्यालयाचे आदेश जा क्र शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१९-२०/१७७८,दि.२७.२.२०२०

४.शालेय शिक्षण विभागामार्फत शासन शुध्दीपत्रक क्र. एसएफएस-१०१९/प्र क्र ११२७/एसएम-२, दि.२५.१.२०२३

५.प्राचार्य आदित्य इंटरनॅशनल स्कूल डुडुळगांव पीसीएमसी-४१२१०५यांचेकडील पत्र जा क्र ०२७ दिनांक ६.१२.२०२३

शासन निर्णय संदर्भीय क्रमांक १ अन्वये श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे संचलित आदित्य इंग्लिश मिडिअम स्कुल, डुडळगाव पो आळंदी देवाची, ता. हवेली जि पुणे या नविन प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा इंग्रजी माध्यम राज्यमंडळ संचलित शाळेस सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यांत आलेली होती. तदनंतर संदर्भीय क्रमांक १ चे शासन निर्णयाचे अनुषंगाने या कार्यालयाने संदर्भीय क्रमांक ३ व्दारे सदर शाळेस परवानगीबाबत आदेश निर्गमित केलेले होते.

तदनंतर संदर्भीय क्र. २ अन्वये उपरोक्त शासन निर्णयामध्ये शाळेचे मंडळ **राज्यमंडळ ऐवजी सी.बी.एस.ई** असे वाचावे यानुसार शासन शुध्दीपत्रक निर्गमित झालेले आहे तसेच तदनंतर ४ चे शासन शुध्दीपत्रकान्वये शाळेचे नांव **आदित्य इंटरनॅशनल स्कूल** असे वाचावे तसेच संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील यानुसार संदर्भीय क्र. २ व ४ चे शासन शुध्दीपत्रक निर्गमित झालेले आहे

तसेच सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी शि.अ. (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांची राहील . शासन शुध्दीपत्रक संदर्भीय क्रमांक २ व ४ चे अनुषंगाने संदर्भीय क्रमांक ५ चे संबंधित प्राचार्यांचे प्राप्त विनंतीनुसार हे पत्र निर्गमित करणेत येत आहे.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण
तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

27/8/24

प्रति,

.प्राचार्य, श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, ओतुर, ता. जुन्नर, जि.पुणे संचलित आदित्य इंटरनॅनल स्कूल सीबीएसई गट क्र.७६ डुडुळगांव ता हवेली जि पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

मा.शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत : माहितीस्तव रवाना : शिक्षणाधिकारी (पुणे) जिल्हा परिषद,पुणे